# KIRAN TUTORIALS

Seat No. | | | | | | | |

**Std 10 (English)** | **Marathi** | **Date 01-10-20**

**Time 1HRS** | **Chapter 2.00,21,22,23,7.00** | **Marks 25**

**Q.1** **पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **7**

**1** **A1)** i) आकृती पूर्ण करा 1

[ ] { आपण विसरलेल्या गोष्टी } [ ]

**Ans** [ चालणे ] { आपण विसरलेल्या गोष्टी } [ सायकल चालवणे ]

ii) चौकटी पूर्ण करा 1

i. भाजी आणण्यासाठी आपण हे वाहन वापरतो - ______

ii. बसनेप्रवास करणे असे वाटते - ______

**Ans**

i. भाजी आणण्यासाठी आपण हे वाहन वापरतो - **बाईक**

ii. बसनेप्रवास करणे असे वाटते - **कमीपणाचे**

> "मी ठरवलंय, मी कॉलेजला जाताना सायकल वापरणार. मला माझे पाय रेखामावशीं सारखे चंदेरी हवेत," अभिषेक एकदम भारावून गेला होता. "माझ्यातर कॉलेज समोरच बसस्टॉप आहे. आजपासून मी बसनंच ये - जा करणार. ठरलं एकदम!" स्नेहलनं निश्चयच केला.
>
> "खरंय पोरांनो, आजकाल चालणं, सायकल वापरणं विसरूनच गेलोय आपण. अगदी कोपऱ्यावरून भाजी जरी आणायची असली तरी आपण बाईकला किक मारतो आणि पुन्हा व्यायामाकरता वेगळं मॉर्निंग वॉकचं नाटक करतो," "बसनं प्रवास करणं तर आपल्याला कमीपणाचं वाटतं; पण आपल्या पायांना चिकटलेला कार्बन प्रमाणात ठेवण्याकरता पब्लिक ट्रान्सपोर्ट इज मस्ट,"
>
> रेखामावशी सगळ्यांचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होत्या. बोलता बोलता हलकेच त्यांनी आपल्या पायाचे फरशीवरचे ठसे ओल्या फडक्याने पुसून घेतले.
>
> "पाह्यलंत, किती सहजपणे पुसले आपल्या मळलेल्या पायांचे ठसे रेखामावशींनी," सुमित म्हणाला.
>
> "पण आपल्या पायांचे वातावरणावर उमटलेले ठसे मात्र, आपल्याला इतक्या सहजतेने नाही बरं पुसता येणार. त्याकरता आपल्याला झाडं लावावी लागतील... या हिरव्यागर्द झाडांनी आपली काळीकुट्ट पावलं थोडी तरी उजळ होतील," सुमित भरभरून बोलत होता. "हो ना, नाही तर आपण तसेच धावत राहू. मळलेल्या पायांची माणसं बनून!" पावडेकाका बोलले आणि त्या निव्व्याशार तुकड्यावर चांदणं उमलल्याचा त्यांना भास झाला.

**Ans**

**A2)** i) एका शब्दात उत्तरे लिहा. 1

i. व्यायामासाठी आपण याच नाटक करतो. - ______

ii. अभिषेकने केलेला निश्चय - ______

**Ans**

i. व्यायामासाठी आपण याच नाटक करतो. - **मॉर्निंगवॉक**

ii. अभिषेकने केलेला निश्चय - **सायकलने कॉलेजला जाणे.**

ii) सत्य की असत्य ते लिहा. 1

i. रेखामावशींची पावले चंदेरी आहेत.

ii. स्नेहल सायकलने कॉलेजला जाणार आहे.

**Ans**

i. रेखामावशींची पावले चंदेरी आहेत - **सत्य.**

ii.स्नेहल सायकलने कॉलेजला जाणार आहे - **असत्य.**


**A3)** स्वमत 3


'तापाने फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सूचवा.


**Ans** आपली धरती तापाने फणफणली आहे याचा अर्थ सर्वत्र तापमानवाढ होत आहे. आपण विकासाच्या नावाखाली निर्दयीपणे वृक्षतोड केली. वृक्षतोडीमुळे वातावरणाचा समतोल बिघडला आहे. आपल्या वातावरणातील कार्बनचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. खाजगी वाहने, उदयोग व्यवसाय, कारखाने यातून दुषित वायू व प्रदुषणास कारणीभूत घटक हवेत सोडले जातात. त्याचबरोबर पृथ्वीवरील नदी, विहिरी, तळी, तलावे, नाले हे ही नष्ट होत आहेत. यामुळे वातावरण तप्त होत आहे. ही स्थिती बदलण्यासाठी आपण निसर्गप्रेमी व्हावे, पर्यावरणप्रेमी व्हावे. जास्तीत जास्त झाडे लावावी. कार्बनचे प्रमाण कमी होईल यासाठी रेल्वेचा वापर करा. लहान अंतरासाठी सायकलचा वापर करावा. तसेच खाजगी वाहनांचा कमीत कमी वापर करून सार्वजनीक वाहनांचा वापर करावा.


**Q.2 पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **8**

1 **A1)** आकृती पूर्ण करा 2

1) 


**Ans** 


2) 


**Ans** 


जेवीं चंद्रकिरण चकोरांसी | पांखोवा जेवीं पिलियांसी |
जीवन जैसे कां जीवांसी | तेवीं सर्वांसी मृदुत्व ||
जळ वरिवरी क्षाळी मळ | योगिया सबाह्य करी निर्मळ |
उदक सुखी करी एक वेळ | योगी सर्वकाळ सुखदाता ||
उदकाचें सुख तें किती | सवेंचि क्षणें तृषितें होती |
योगिया दे स्वानंदतृप्ती | सुखासी विकृती पैं नाही ||
उदकाची जे मधुरता | ते रसनेसीचि तत्त्वतां |
योगियांचे गोडपण पाहतां | होय निवविता सर्वेंद्रियां ||
मेघमुखें अध:पतन | उदकाचें देखोनि जाण |
अध:पातें निवती जन | अन्नदान सकळांसी ||
तैसे योगियासी खालुतें येणें | जे इहलोकीं जन्म पावणें |
जन निववी श्रवणकीर्तनें | निजज्ञानें उद्धरी ||

**Ans**

**A2)** घटनेनुसार वाक्यांचा क्रम लावा 2

i. अन्नदान सकळांसी.
ii. जे इहलोकी जन्म पावणें.
iii. सुखासी विकृती पैं नाही.

iv.योगी सर्वकाळ सुखदाता.

**Ans**
i. योगी सर्वकाळ सुखदाता
ii. सुखासी विकृती पैं नाही
iii.अन्नदान सकळांसी
iv.जे इहलोकी जन्म पावणें

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

i. पाखोवा -
ii. जीवन, उदक, जल -
iii. जीव -
iv. मृदुत्व -

**Ans** i. पाखोवा - **पक्षिणीचे पंखपक्षिणीचे पंख**
ii. जीवन, उदक, जल - **पाणी**
iii. जीव - **प्राणीमात्र**
iv. मृदुत्व - **मऊ, कोमल**

**A4)** स्वमत 2

योगी पुरूष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.

**Ans** योगी पुरूष आणि पाणी इहलोकात आल्यामुळे सर्वांना आनंद होतो लोकांना पाणी मिळते. शेतीची चिंता मिटते अन्नदान सर्वांना मिळते. योगी पुरूष सगळ्यांना कीर्तन, भजन ऐकवून संतुष्ट करतो. तसेच त्यांचे आत्मज्ञान वाढवतो. पाणी जर बाह्य दुःखाचे निवारण करतो. तर योगी पुरूष आंतरिक यातनांचे निवारण करतो.

**Q.3** **पुढीलपैकी कृती सोडवा : (स्थूलवाचन)** **3**

**1** पणतीच्या उदाहरणातून कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.

**Ans** पणतीच्या उदाहरणातून कवितेत स्पष्ट केले आहे की अगदी छोट्या जीवातही जगाला काहीतरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते. प्रचंड तेजस्वी सूर्यालाही मावळताना पृथ्वीची चिंता वाटते कोणीतरी येऊन पृथ्वीला वाचवावे अशी अपेक्षा सूर्य करताना छोटीशी पणती पुढे येऊन नम्रपणे सूर्याला आश्वासन देत म्हणते, माझ्याकडून जेवढे होईल तेवढे मी पृथ्वीला प्रकाशित करण्याचे प्रयत्न करीत राहिन. छोटी पणती आपल्या कतृत्वाने तिच्यापेक्षा अधिक शक्तीशाली सूर्यालाही मदत करते.

**Q.4** **पुढील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **1**

**1** i. संकल्प - ..............
ii. जीभ - ..............

**Ans** i. संकल्प - **निर्धार**
ii. जीभ - **जिव्हा**

**Q.5** **कथालेखन(Any One)** **6**

**1** **खालील मुद्द्यावरून कथा लिहा.**

**मुद्दे –**
एक सैनिक – शत्रूकडून कैद – तुरुंगात हाल सहन करणे – सुटका – रस्त्यात पोपट विकणारा – पोपटांचे सर्व पिंजरे खरेदी करणे – पोपटांना सोडून देणे – स्वातंत्र्याचेमहत्त्व – तात्पर्य.

**Ans** .

**2** **खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.**
**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

रोझी मन लावून अभ्यास करत होती. सभोवती सगळा वह्या -पुस्तकांचा पसारा होता. अभ्यास करता-करता तिचे लक्ष

तिच्या आवडत्या  फिकट  निळ्या रंगाच्या वहीकडे गेले. वहीच्या पानातून मोरपिसाचे टोक डोकावत होते. तिने हातातले अभ्यासाचे पुस्तक मिटवले आणि ...............

**Ans** .